शिवारचर्चा

# शेतात पाचट राखणं ठरतं हितावह

## जाळणं म्हणजे निव्वळ नुकसान; वातावरणातील धग वाढवणं!

**को**णतीही चांगली गोष्ट शेतकऱ्यांच्या पचनी पडायला बराच काळ जातो. पाचट व्यवस्थापनाचेही तसेच आहे. शेतकऱ्यांना कितीही समजावून सांगितलं तरी अजून पाचट ठेवण्याबाबत उदासीनता दिसते. पाचट हा ऊस शेतीचा आत्मा आहे. जर तुम्ही हा आत्माच नष्ट करत असाल तर?

काडेपेटीतील एक काडी ओढून आपण एका एकरातील पाचट अर्ध्या तासात जाळून राख करून टाकतो. परंतु त्याच पाचटातून आपण जमिनीला नत्र, स्फुरद, पालाश मिळवून देऊ शकतो हे आपल्या लक्षातच येत नाही. कोणत्याही आडसाली ऊसातून हेक्टरी जवळपास ८ ते १२ टन पाचट निघते. त्या पाचटामध्ये असणारे ४० ते ५० किलो नत्र, २० ते ३० किलो स्फुरद व ७५ ते १०० किलो पोटॅश पुढील पिकास उपलब्ध होते. आज ऊस क्षेत्राचा विचार केला तर जवळपास ७०% शेतकरी ऊसाचे पाचट जाळून वाया घालवत आहेत. हे पाचट जाळल्यामुळे हवेचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन उष्णतेने जमीन, त्यातील उपयुक्त जिवाणू आणि गांडुळांवर देखील परिणाम होत आहे. आपण आपल्या हाताने जमिनीचे आरोग्य बिघडवण्यासाठी मदत करत आहोत हेच यावरून सिद्ध होते. प्रचंड उष्णतेमुळे जमिनीचा वरचा पिकाऊ थर आपण जाळून वाया घालवत आहोत व जमीन नापीक बनवत आहोत.

खरे तर पाचट ठेवल्यामुळे आपल्या शेतीला प्रचंड फायदे आहेत. हे फायदे एकदा समजले तर नक्कीच आपण पाचट न जळता त्याचे व्यवस्थापन करायला सुरुवात करू. त्यासाठी खालील बाबी लक्षात घेऊ.

* पाचटाची कुट्टी करून सरीमध्ये त्याचे आच्छादन केल्यास तण उगवत नाही. त्यामुळे भांगलणी व मशागतीच्या खर्चात जवळपास ५० टक्के बचत होते.

* कृषी संशोधन संस्थांच्या शिफारशीनुसार ऊस पिकास हेक्टरी २.५ ते ३.५ कोटी लिटर पाण्याचा सिंचनासाठी वापर केला जातो. पाचट ठेवल्याने हेक्टरी १.२५ ते १.५० कोटी लिटर पाण्याची व ते वहन करण्यासाठी आवश्यक सुमारे १०० ते १२५ युनिट विजेची बचत होते.

* पाचटाच्या पूर्ण आच्छादनामुळे जमिनीच्या पृष्ठभागावरून होणाऱ्या बाष्पीभवनाचा वेग कमी होतो. शेतात ओलाव्याचे प्रमाण दीर्घकाळ (१५ ते २० दिवस) टिकून राहते. त्यामुळे भारनियमनामुळे पाण्याच्या पाळ्यांतील अंतर वाढले तरी ऊसाची वाढ चांगली होते.

* शेतात पाचट ठेवल्यामुळे जमिनीचे तापमान ३ ते ५ अंश सेल्सिअसने थंड राखले जाते.

* शेतात गांडुळांची व उपयुक्त जिवाणूची नैसर्गिकरित्या मोठ्या प्रमाणात वाढ होते, त्यामुळे जमीन भुसभुशीत होऊन हवा खेळती राहते, त्यामुळे पांढऱ्या मुळांची वाढ भरपूर प्रमाणात होते.

* पाचटातील सेंद्रिय पदार्थांमुळे जमिनीचे भौतिक, रासायनिक गुणधर्म सुधारतात. जलसंधारण शक्ती वाढते.

पाचट व्यवस्थापन म्हणजे आपल्या शेतातून जे पाचट निघतं ते बारीक करून शेतातच गाडणे आणि त्याच्यापासून सेंद्रिय खताची निर्मिती शेतातच करणे. यामध्ये पाचट कुट्टी मशिनच्या सहाय्याने पाचट बारीक करून घ्यावे. पाचट पूर्णपणे सरीत दाबून घेऊन बगला चिरून त्यावर माती टाकावी. त्याचवेळी पाचटावर एकरी दोन बॅग युरिया आणि दोन बॅग सुपर फॉस्फेट त्यासोबत पाचट कुजवणाऱ्या जिवाणूंचे कल्चरही टाकावे म्हणजे ८० ते ९० दिवसांत हे पाचट कुजून जाईल.

त्यानंतर शक्य असल्यास शेताला पाटाद्वारे पाणी द्या. ज्या शेतकऱ्यांच्याकडे ड्रीप आहे त्यांनी ड्रीप सरीवर अंथरून पाणी द्यावे. ४० ते ५० दिवसांनी पॉवर टिलर पुढे चालवून पाचट मातीत मिक्स करावे. अशा पद्धतीने नियोजन केल्यास पाचट ८० ते ९० दिवसांत कुजून जाईल व नंतर खोडव्याला भर देखील लावता येईल.

बऱ्याच शेतकऱ्यांना ऊस गेल्यावर लगेच दुसरे पीक घ्यायचे असते त्यामुळे ते पाचट जाळून टाकतात व जमीन तयार करतात. आपणास लगेच कोणतेही पीक घ्यायचे असल्यास पाचट आहे तसे ठेवून कुट्टी करून डबल रोटर मारून घ्या व खोल नांगरट करा. अशा पद्धतीने नियोजन केल्यास जमीन लवकर तयार होईल.

एक गोष्ट लक्षात ठेवावी, पाचट जाळणे म्हणजे दहा जन्मांचे पाप या एकाच जन्मात करणे आहे! जर आपण जमिनीचा आत्माच जाळून नष्ट करत असू तर आपल्या शेती करण्याला काहीही अर्थ राहत नाही. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने निश्चय करावा की मी पाचट जाळणार नाही; तर पाचटाचे व्यवस्थापन करून मी जमिनीची गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न करेन.

(संकलित)